RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ११, अंक १३६(२)] मंगळवार, सप्टेंबर २३, २०२५/आश्विन १, शके १९४७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ३४७**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### उच्च व तंत्र शिक्षण विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२,

दिनांक २३ सप्टेंबर, २०२५.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५.**

क्र.प्रनिप्रा-२०२५/प्र.क्र.२५९/तांशि-४.— ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ (२०१५ चा महा. २८) (यात यापुढे ज्याचा निर्देश, "उक्त अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम ७ च्या पोट-कलम (१), (२), (३) व (४) तसेच, कलम ८ यांद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून निर्गमित केलेली शासन अधिसूचना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.संकीर्ण-२०१५/(७२/१५)/(भाग-२)/तांशि-४, दिनांक २२ ऑगस्ट, २०१९ (यात जिचा निर्देश, "उक्त अधिसूचना" असा केला आहे) प्रसिद्ध केली आहे आणि उक्त अधिनियमान्वये सोपविलेली कार्ये पार पाडण्यासाठी आणि त्यास प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करण्यासाठी प्रवेश नियामक प्राधिकरण (यात यापुढे ज्याचा निर्देश, "उक्त प्राधिकरण" असा केला आहे) घटित केले आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त प्राधिकरणाचे नामनिर्देशित सदस्य असणारे व्यावसायिक शिक्षण क्षेत्रातील ख्यातनाम तज्ज्ञ डॉ. एन. एस. उमराणी, यांचा पदावधी संपुष्टात आलेला आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनास, उक्त अधिनियमाच्या कलम ७ च्या, पोट-कलम (३) च्या खंड (ग) च्या तरतुदींनुसार, उक्त प्राधिकरणावर व्यावसायिक शिक्षण क्षेत्रातील ख्यातनाम तज्ज्ञ म्हणून, डॉ. विनोद ब्रिजलाल वनवारी, निवृत्त विभागप्रमुख, स्थापत्य अभियांत्रिकी विभाग, एसबीएम तंत्रनिकेतन, मुंबई यांची नामनिर्देशनाच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीसाठी किंवा त्यांनी वयाची पासष्ट वर्षे पूर्ण करेपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंतच्या कालावधीसाठी, नियुक्ती करणे इष्ट वाटते;



Part IV-B Extra 347.indd 1 26/09/2025 12:55:29

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाच्या कलम ७ च्या पोट-कलम (१), (२), (३) व (४) तसेच, कलम ८ यांद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, उक्त प्राधिकरणावरील रिक्त पदावर पुढील सदस्याची नामनिर्देशनाच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीसाठी किंवा त्यांनी वयाची पासष्ट वर्षे पूर्ण करेपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंतच्या कालावधीसाठी नियुक्ती करीत असून, त्या प्रयोजनार्थ उक्त अधिसूचनेमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :—

उक्त अधिसूचनेमध्ये, परिच्छेद २ मधील नोंद क्रमांक (३) ऐवजी, पुढील नोंद दाखल करण्यात येईल :

“(३) डॉ. विनोद ब्रिजलाल वनवारी, सदस्य”.
व्यावसायिक शिक्षण क्षेत्रातील
ख्यातनाम तज्ज्ञ.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार नावाने,

**संतोष खोरगडे,**
शासनाचे सहसचिव.

## HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mumbai 400 032,

Dated the 23rd September 2025.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA UNAIDED PRIVATE PROFESSIONAL EDUCATIONAL INSTITUTIONS (REGULATION OF ADMISSIONS AND FEES) ACT, 2015.

No.ARA-2025/C.R.259/TE-4.—Whereas, the Government of Maharashtra has, *vide* Government Notification, Higher and Technical Education Department, No. MISC-2015/(72/15)/(Part-2)/TE-4, dated the 22nd August 2019 (hereinafter referred to as "the said notification"), issued in exercise of the powers conferred by sub-sections (*1*), (*2*), (*3*) and (*4*) of section 7 read with section 8 of the Maharashtra Unaided Private Professional Educational Institutions (Regulation of Admissions and Fees) Act, 2015 (Mah. XXVIII of 2015) (hereinafter referred to as "the said Act"), constituted the Admissions Regulating Authority (hereinafter referred to as "the said Authority") to exercise the powers conferred on and discharge the functions assigned to it under the said Act;

And whereas, term of office of the nominated member, Dr. N. S. Umarani, expert of repute from the field of Professional Education on the said Authority has been expired;

And whereas, the Government of Maharashtra considers it expedient to appoint Dr. Vinod Brijlal Vanvari, retired Head of Civil Engineering Department, SBM Polytechnic, Mumbai, as the member, expert of repute from the field of Professional Education on the said Authority, as per the provisions of clause *(c)* of sub-section (*3*) of section 7 of the said Act, for the term of five years from the date of the nomination or till he attains sixty-five years of age, whichever is earlier;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-sections *(1), (2), (3)* and *(4)* of section 7 read with section 8 of the said Act, the Government of Maharashtra, hereby appoints the following member on the said vacant post on the said Authority for the term of five years from the date of the nomination or till he attains sixty-five years of age, whichever is earlier and for that purpose amends the said notification as follows, Namely :—

In the said notification, in paragraph 2, for entry (3), the following entry shall be substituted, namely :

"(*3*) Dr. Vinod Brijlal Vanvari, expert of repute from the field of Professional Education. Member".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SANTOSH KHORGADE,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.